# शनि देवाच्या देणगीवर विश्वस्थांचीच वक्रदृष्टी

## सगळ्यांची कुंडली बाहेर आली ; देवस्थानमध्ये कोट्यवधींचा घोटाळा



### बागेच्या देखरेखीसाठी ८० जण

देवस्थान आतापर्यंत २५० ते ३०० कर्मचाऱ्यांवर व्यवस्थित चालत होते. मात्र घोटाळेबाजांनी कागदोपत्री २४४७ कर्मचारी नियुक्त केल्याचे दाखवले. हे सर्व कर्मचारी बोगस होते.

देवस्थानच्या रुग्णालयात ३२७ कर्मचारी कार्यरत असल्याचे कागदोपत्री दाखवले होते. प्रत्यक्षात तपासणीत रुग्णालयात एकही रुग्ण नव्हता. १५ खाटा, ८० वैद्यकीय आणि २४७ अकुशल कर्मचारी असे दाखवले असताना, प्रत्यक्षात केवळ ४ डॉक्टर आणि ९ कर्मचारी हजर होते. अस्तित्वात नसलेल्या रुग्णालयाच्या बागेच्या देखरेखीसाठी ८० कर्मचारी दाखवण्यात आले होते.

### बोगस ॲप तयार करून भक्तांना लुटले

आमदार विठ्ठल लंघे आणि आमदार सुरेश धस यांनी नकली ॲप तयार करून भाविकांकडून पूजेसाठी त्यावर पैसे घेतले जात असल्याचा प्रकारही सभागृहात उपस्थित केला होता. धस यांनी आरोप केला की या ॲपच्या माध्यमातून किमान ५०० कोटींची रक्कम गोळा करण्यात आली आहे. बावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की सायबर पोलीस याचा तपास करत आहेत, धस यांनी आणखी एक आरोप केला असून त्यांनी म्हटले आहे की, बोर्डाचे ट्रस्टी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी दर महिन्याला १० ते २० कोटींची संपत्ती विकत घेतल्याची बाथ पुढे येत आहे. यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी म्हटले की देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की, जे ट्रस्टी लोकसेवक वा संजेत येत असतील त्यांच्या अपसंपदेची चौकशी केली जाईल,

- १०९ खोल्या असलेल्या भक्तनिवासात २०० कर्मचारी कार्यरत असल्याचे दाखवले, प्रत्यक्षात २ ते १० कर्मचारी आढळले.
- देणगीसाठी ८ आणि तेल विक्रीसाठी ४ काउंटरवर केवळ २ कर्मचारी काम करत असताना, तिथे ३२५ कर्मचारी दाखवण्यात आले.
- गोशाळा विभागात ८२ कर्मचारी दाखवले, त्यापैकी २६ कर्मचारी रात्री १ वाजेपासून काम करतात असे दाखवले.
- १३ गाड्यांच्या पार्किंगमसाठी १६३ कर्मचारी दाखवले, प्रत्यक्षात १३ कर्मचारी आढळले.
- वृक्ष संवर्धन विभागात ८३ कर्मचारी दाखवले, प्रत्यक्षात कोणीही नव्हते.
- शेती विभागात ६५ कर्मचारी दाखवले.
- पाणी पुरवठा विभागात ७९ कर्मचारी दाखवले.
- पार्किंग परिसर स्वच्छ करण्यासाठी ११८ कर्मचारी दाखवले.
- सुरक्षा विभागात ३१५ कर्मचारी दाखवले.
- प्रसादालयात ९७ कर्मचारी दाखवले, ते कुठेही दिसून आले नाहीत.
- देवस्थानच्या १३ वाहनांसाठी १७६ कर्मचारी दाखवले.
- विद्युत विभागात २०० कर्मचारी दाखवले.



### बनावट ॲपवरून भक्तांना लुटले, तबल २,४४७ कर्मचाऱ्यांची भरती

मुख्यमंत्री फडणवीस यांनी ट्रस्टच्या व्यवहारांची चौकशी केलेल्या सरकारी समितीच्या अहवालातील धक्कादायक माहिती सभागृहाला दिली, तेव्हा सभागृह अवाक् झाले. बनावट ॲपवर भक्तांकडून देणग्या घेतल्या जायच्या आणि त्यातील कोट्यवधी रुपये हे विश्वस्तांच्या कार्यकर्त्यांच्या नावे उघडलेल्या बँक खात्यांमध्ये परस्पर जमा व्हायचे, असा गौप्यस्फोटही मुख्यमंत्र्यांनी केला. २ एकच ॲप खरे तर अन्य बनावट होते. या प्रकाराची सायबर सेलच्या अति. पोलिस महासंचालकांमार्फत चौकशी केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. या मंदिरात भी गेली अनेक वर्षे जातो.

### बाहेरच्या अधिकाऱ्यांकडून घोटाळ्याची चौकशी

शनि शिंगणापूरच्या शनि मंदिरातील घोटाळ्यांप्रकरणी पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. त्यातील घोटाळेबाजांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले जातील. बाहेरच्या अधिकाऱ्यांकडून या घोटाळ्याची सखोल चौकशी केली जाईल. कारण आधी धर्मादायच्या एका अधिकाऱ्याने एवढे होऊनही क्लीन चिट दिलेली होती. असा चुकीचा अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्याची चौकशी केली जाईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### पंढरपूर, शिर्डीच्या धर्तीवर शिंगणापूरमध्ये समिती :



पंढरपूरमधील विठ्ठल देवस्थान, शिर्डीतील साईबाबा संस्थानच्या धर्तीवर शनि शिंगणापूर मंदिराच्या संचालनासाठी शासकीय समिती स्थापन करण्याचा कायदा विधिमंडळाने केलेला आहे. त्याची अंमलबजावणी लवकरच केली जाईल, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी या पुढे मंदिरावर शासकीय नियंत्रण असेल असे संकेत दिले.

शनि शिंगणापुर । दिव्य न्युज

एकाही घराला कडी-कोयंडा नाही. तिथे चोरी होतच नाही कारण चोरांना शनिदेव शिक्षा करतो. अशी श्रद्धा इथल्या लोकांमध्ये आहे. याच शनि मंदिराचे कामकाज पाहणाऱ्यांनी शनिदेवाच्या डोळ्यादेखत कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला आहे. या चोरांना शनिदेव आता काय शिक्षा देतो याची उत्सुकता शनि-शिंगणापूरवासीयांना आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध शनि शिंगणापूर देवस्थान हे संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. इथे देवाच्या नावावर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका चौकशी समितीच्या अहवालातून हे भीषण वास्तव उघड झाले आहे. देवस्थानच्या कारभारात २४४७ बोगस कर्मचारी दाखवून कोट्यवधींचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांना प्राप्त झाला असून त्यांनी इथे घोटाळा कसा झाला त्याच्या सगळ्या डिटेल्स सभागृहातच सांगितले.

अस्तित्वात नसलेल्या कर्मचा-यांचा पगार कार्यकर्त्यांच्या खात्यात

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, चौकशी समितीच्या, कागदोपत्री दाखवलेल्या एकूण २४७४ कर्मचाऱ्यांपैकी कोणाचे मस्टर सापडले नाही, त्यांचा हजेरीपटही नव्हता आणि कोणाची सही देखील नव्हती. घोटाळेबाजांनी त्यांच्या कार्यकत्यांनाब बैंक खाती उघडायला लावली होती. मंदिराच्या खात्यातून अस्तित्वात नसलेल्या कर्मचाऱ्यांना नियमितपणे पगार मिळत होता. पगाराची रकम प्रत्यक्षात कार्यकर्त्यांच्या खात्यात जात होती.

## विशाल सराफ यांच्या उपोषणाला यश,ऐतिहासिक किल्ल्याच्या सुशोभीकरणासाठी लेखी आश्वासन मिळताच उपोषण मागे

### परिसरात कॅमेरे, पथदिवे व स्वच्छतेची कार्यवाही लवकरच!

किल्ले धारूर । दिव्य न्युज

शहरात ऐतिहासिक किल्ला आहे पुरातत्त्व विभागाच्या दुर्लक्षामुळे या किल्ल्याची दैना झाली आहे यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे त्यामुळे ही होणारी गैरसोय टाळण्यासाठी विविध मागण्या घेऊन विशाल सराफ यांनी दि.१० जुलै रोजी धारू तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते या उपोषणाची तहसील व नगरपरिषद प्रशासनाने दखल घेऊन विशाल सराफ यांना त्यांच्या मागण्या मान्य केल्या असून लेखी स्वरूपात मागण्या मान्य करण्याचे पत्र दिल्यानंतर विशाल सराफ यांच्याकडून उपोषण मागे घेण्यात आले आहे. यावेळी स्वतः नायब तहसीलदार नजीर खुरेशी व मुख्याधिकारी महेश गायकवाड सह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

धारूर शहराच्या पश्चिमेस ऐतिहासिक किल्ला आहे मागच्या काळात या किल्ल्याच्या पडझड झालेल्या बांधकामासाठी निधी आला होता या निधीतून काही प्रमाणात बांधकाम झालेले आहे त्यामुळे काही प्रमाणात या किल्ल्याची शोभा वाढलेली आहे यामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटक हा किल्ला पाहण्यासाठी येण्याचा योग सुरू झाला असला तरी मागील एक ते दोन वर्षांमध्ये पुन्हा हा ऐतिहासिक किल्ला पुरातत्त्व विभागाकडुन दुर्लक्षित होताना दिसून येत आहे सध्या या किल्ल्यात संरक्षक नसल्याने या ठिकाणी काही गैरप्रकार घडत आहेत. त्यामुळे महादुर्ग किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे, या



रस्त्यावर झालेले अतिक्रमण काढण्यात यावे, किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेने पथदिवे बसविण्यात यावे तसेच या भागात चांगल्या प्रकारे सुशोभीकरण करण्यात यावे या मागण्या घेऊन विशाल सराफ यांच्याकडून तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते या उपोषणास बालाजी चव्हाण, सुरेश शेळके, सुनील कावळे ,विश्वास शिनगारे आदींनी भेट देऊन उपोषण करते व प्रशासन यांच्यात मध्यस्थी करून विशाल सराफ यांच्या मागणीप्रमाणे मागण्या मान्य करण्यात प्रशासनाने सहमती दर्शवली आहे आणि तशा प्रकारचे लेखी पत्र उपोषणकर्ते विशाल सराफ यांना देण्यात आले आहे यावेळी स्वतः नायब तहसीलदार नजीर कुरेशी मुख्याधिकारी महेश गायकवाड यांनी या उपोषण स्थळी भेट देऊन उपोषण सोडवले यावेळी रोहित फावडे, सतीश गायकवाड हनुमान तोंडे,सह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवा भाऊ महाराष्ट्र हा कोणत्या दिशेने जात आहे- शेख युनूस

बीड । दिव्य न्युज



महाराष्ट्र हा पुरोगामी विचाराचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर चालणारा देश आहे. आणि भर विधानसभेत जर सरकार मधील शंभूराजे देसाई महाराष्ट्राचे गृह (ग्रामीण) वित्त, नियोजन राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व उद्योजकता पणन या विभागाचे विद्यमान राज्यमंत्री व आमदार आहेत. व हे जर भर विधानसभेत विधान परिषद अध्यक्षा मा. श्रीमती नीलम ताई गोऱ्हे यांच्या समोर अनिल परब यांना अक्षरशः धमकी देत आहे. ' तू बाहेर ये तुला बघतो ' ही सर्व महाराष्ट्राची जनता लाईव्ह पाहत आहे. लहान मुलांना ही लाजवेल अशी गोष्ट होत आहे. त्याचप्रमाणे दुसरीकडे आमदार गायकवाड हे विधानसभेत एका कॅन्टीन मध्ये जाऊन एका कर्मचाऱ्याला एखाद्या बॉक्सर सारखे मारत आहेत.महाराष्ट्रातील जनतेने याच्यासाठी तुम्हाला विधानभवनात आमदार म्हणून पाठवले आहे का?

साहेब, गरिबाला मारण्यापेक्षा त्या विभागातील मंत्र्याला मारायला पाहिजे. स्वस्त धान्याच्या नावाने गोरगरिबांना जनावरे पण खाणार नाही असे गहू आणि तांदूळ दिले जात आहे महाराष्ट्रातील कित्येक रस्त्यांना खड्डे पडल्यामुळे कित्येक अपघात होतात, कित्येक जीव जातात त्याला जबाबदार असणाऱ्या मंत्र्यांना पण तुम्ही अशीच मारहाण करणार का? त्याबद्दल आपण थोडं बोला साहेब..यापेक्षा तर शाळेतील लहान मुले खूप चांगली म्हणावी लागेल.

## ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी प्रशासनिक अधिकारी, लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष!

### प्रसिद्धी माध्यमांचे मनस्वी आभार-रमेश गंगाधरे,एस.एम.युसूफ़

बीड । दिव्य न्युज

ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी प्रशासनिक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष देत असल्याचे मत रमेशराव गंगाधरे आणि एस.एम.युसूफ़ यांनी व्यक्त करत प्रसिद्धी माध्यमांचे आभार मानले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी सन २०१४ सालापासून लढा सुरू आहे. गेल्या ११ वर्षात याविषयी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार एवढेच नव्हे तर जिल्हा पोलीस अधीक्षकांना सुद्धा वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत. या लढ्यास लोकशाहीचे चौथे आधारस्तंभ असलेल्या पत्रकारिता क्षेत्रातूनही वेळोवेळी वाचा फोडण्यात आलेली आहे. या लढ्यास बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील वृत्तपत्रांकडूनही तेवढ्याच तोलामोलाचे सहकार्य मिळत आहे. यामुळे कारंजा टॉवर चा विषय आता फक्त बीड शहर किंवा जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता मराठवाड्यासह महाराष्ट्रात सुद्धा पोहोचला आहे. कारंजा टॉवरसाठी नागरिक पुढे येऊन स्वखर्चाने एक-एक कामे मार्गी लावत आहेत. गेल्या काही महिन्यात लोकसहभागातून कारंजा टॉवरसाठी ५ कामे झाली आहेत. तरीही उर्वरित १२ कामे अजून बाकी आहेत. याकरिता उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना सातत्याने निवेदन रुपात आठवण करून देण्याचे कार्य नित्यनेमाने केले जात आहे. शिवाय शासन-प्रशासन जागरूक व्हावे, याकरिता प्रसिद्धी माध्यमातून सातत्याने बातम्या व लेख प्रकाशित करण्यासाठी दिले जात आहे. मात्र शासन-प्रशासनाकडून अजूनही या ऐतिहासिक वास्तूकरिता ठोस कार्य करण्यासाठी पाऊल उचलले जात नाहीये. यामुळे लढा अजून संपलेला नाही तर सुरूच आहे. जोपर्यंत परिपूर्ण नूतनीकरण होणार नाही, तोपर्यंत ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी लढा सुरूच राहणार आहे. ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी प्रशासनिक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष ठेवणार असल्याचे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी व्यक्त केले आहे.








## जिंतूर येथे होमिओपॅथिक डॉक्टरच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देऊन आय. एम. ए संघटनेच्या भुमीकेवर टिका



जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर शहरातील होमीओपॅथीक व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांनी जिंतूरच्या तहसिलदार मार्फत मा मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे की, सिसीपीएम पास झालेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना आय.एम.ए पदअधिकाऱ्या मार्फत सोशल मिडायवर खोटी व दिशाभुल करणारी माहिती पसरविल्या जात आहे सन २०१४ मध्ये कायद्यात सुधारणा करून होमीओपॅथीक पदविला मान्यता देण्यात आली आहे व ३० जून२०२५ रोजी शासनाने नोदणीकरून घेण्यासाठी आदेश सुद्धा काढले आहे तसेच मोठमोठ्या दवाखान्या मध्ये हेच डॉक्टर आयसीयू आणि आरएमओ म्हणून कार्यरत असताना त्याचा विरोध केला जात नाही मात्र नोंदणीच्या वेळी आयएमए संघटनेच्या माध्यमातून विरोध केला जात आहे हे योग्य नाही त्यामुळे आम्ही सर्व होमिओपॅथीक डॉक्टराच्या वतीने शासनाला निवेदन देवून विनंती केली जात आहे की आमच्या निवेदन वार गार्भीयाने विचार करावा या निवेदनावर डॉ सानप, डॉ इरफान पटेल, डॉ नगमा डागरा, डॉ सीमा देशमुख, डॉ प्रियांका ठाकूर, डॉ कडे यांच्या सोबत अनेक डॉक्टरांच्या स्वाक्षऱ्या आहेत

## शालेय शारीरिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे शरीर व मानसिकता मजबूत होते

जिंतूर । दिव्य न्युज

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत शारीरिक शिक्षणाची भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. शाळेमध्ये नियमित व्यायाम, खेळ व शारीरिक क्रियाकलापांमुळे विद्यार्थ्यांचे शरीर निरोगी, मजबूत व लवचिक राहते. शारीरिक शिक्षणामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते, स्नायू व हाडं बळकट होतात, तसेच लठ्ठपणा, हृदयविकार यांसारख्या आजारांपासून संरक्षण मिळते.

खेळांमधून मिळणाऱ्या शिकवणीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सहकार्य, स्पर्धात्मकता आणि आत्मविश्वासही वाढतो. शिक्षणासोबत शरीराला घडवणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थी तंदुरुस्त व चपळ राहत असल्याचे अनेक अभ्यासातून दिसून आले आहे. म्हणून प्रत्येक शाळेत नियमित शारीरिक शिक्षणाची काटेकोर अंमलबजावणी होणे काळाची गरज आहे. असे मत शेख शाहरुख शेख अजिज तालुका क्रिडा मार्गदशक व क्रिडा शिक्षक यांनी व्यक्त केले

## चकलंबा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे तीन विद्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेत पात्र



चकलंबा । दिव्य न्युज (सय्यद गफ्फार)

गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यामिक शाळा चकलंबा शाळेचे स्कॉलरशिप परीक्षा सन-२०२४-२५ या परीक्षेत पाचवी वर्गातील १)गार्गी भागवत घाडगे २)कृष्णा सोमनाथ खेडकर हे दोन विद्यार्थी स्कॉलरशिप धारक झाले आहे. तसेच आठवी वर्गातील १)यश सचिन घोडके हा एक विध्यार्थी स्कॉलरशिप धारक झाला आहे.या तीनही विध्यार्थ्यांना सरकार तर्फे पुढील तीन वर्ष भरघोस शिष्यावृत्ती रक्कम मिळणार आहे..

या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करणारे श्री. गणेश पाचर्णे सरांचे विशेष अभिनंदन तसेच पालक श्री. भागवत घाडगे, श्री. सोमनाथ खेडकर व श्री. सचिन घोडके.तसेच वेळोवेळी सहकार्य करणारे मुख्याध्यापक श्री. गर्कळ बी. एल.सर आणि माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षिका यांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## राजमाता आश्रम शाळा या ठिकाणी बीसीएस, एमसीएस ग्रुपच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

दौलावडगाव / दिव्य न्यूज...

राजमाता प्राथमिक व माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालय मराठवाडी ता. आष्टी जिल्हा बीड या ठिकाणी शनिवार दिनांक१२ जुलै २०२५ रोजी बीसीएस एमसीएस ग्रुपच्या माध्यमातून जवळपास ६०ते ७० मोठी झाडे लावण्यात आली.'चलो साथीओ खुब पेड लगाते है, इस मातृभूमी का मान बढाते है, बंजर भूमी को फिरसे सजाते है, पर्यावरण का अस्तित्व मिलकर बचाते है'. नगरी फॉर नेचर हे घोसवाक्य घेऊन बीसीएस / एमसीएस २००३/२००९ ग्रुपने आज पर्यंत जवळपास सातशे गावातील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, शाळा महाविद्यालयतील प्रांगणामध्ये हजारो वृक्षारोपण केली.झाडे लावा,



झाडे जगवा हीच काळाची गरज आहे. वाढते तापमान, पाणी टंचाई, वायुप्रदूषण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वृक्ष लागवड हा प्रभावी उपाय आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्धवराव टेमकर यांनी म्हटले आहे. याचबरोबर त्यांचे सहकारी मित्र विशाल पंचारिया, शुभांगी जोशी, विद्या गुंड,धर्मराज गुंड, महेश शिंदे, प्रिया उंबरहांडे, सुप्रिया टेमकर, मेजर नंदकुमार अकोलकर,यांनी उपस्थितीत राहून वृक्षरोपण केलं या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे आकाश राजे तरटे संचालक राजमाता शिक्षण प्रसारक मंडळ, परशुराम आबा मराठे सामाजिक कार्यकर्ते आवर्जून उपस्थित राहिले शाळेचे प्राचार्य श्री दानवे सर यांनी सर्वांचे स्वागत केले.सूत्रसंचालन श्री प्रा.कनसे सर यांनी केले या सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठे सर यांनी व राजमाता शिक्षक वृंद आणि विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले.

दिव्य वार्ता
शनिवार १२ जुलै २०२५ | ४

## जिल्ह्यातील नरेगा योजनेमधील वैयक्तिक लाभाचे कुशल देयके लवकर वाटप करावेत- सुजित शिंदे

नेकनूर । दिव्य न्युज

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभाच्या जलसिंचन विहीर, फळबाग,शेततलाव या कामाच्या कुशल बील गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत



आहे.यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, रोजगार हमी योजना कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले यांना युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी पत्रव्यवहार करून वैयक्तिक लाभाचे कुशल देयके लवकरात लवकर देण्यात यावे अशी विनंती केली होती.याची दखल घेउन उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व रोजगार हमी कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी पंचायत समिती बीड येथील मग्रारोहयो अंतर्गत कुशल निधी प्राप्त झाला आहे.परंतु अद्याप पर्यंत ते कुशल देयके वाटप करण्यात आले नाही. सदरील पंचायत समिती कार्यालय मधील वैयक्तिक कामाचे कुशल बील हे सरसकट सोडण्यात यावे यात कोणतेही बील मागे ठेवण्यात येऊ नये.अशी मागणी युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी गटविकास अधिकारी बीड यांच्याकडे केली आहे.

### संजय शिरसाटांचा बेडरूममधील नोटांच्या बॅगेसोबतचा व्हिडीओ राऊतांनी केला शेअर

# कॅशजवळ 'कॅश'

### बॅगेत पैसे नव्हे कपडे, व्हिडिओत काही गैर नाही-संजय शिरसाट

### ५० पैकी एक खोका दिसला, इतके पैसे कुठून आले-आदित्य

मुंबई । दिव्य न्युज

महाराष्ट्राचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट पुन्हा एकदा वादात अडकले आहेत. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' हँडलवरून त्यांचा एक व्हिडिओ शेअर केला. या व्हायरल व्हिडिओमध्ये शिरसाट बेडवर बसून सिगारेट ओढताना दिसत आहेत. त्यांच्या शेजारी नोटांनी भरलेली बॅग आणि आणखी एक बंद बॅग दिसत आहे. या व्हायरल व्हिडिओनंतर राजकारण चांगलेच तापले. ठाकरे सेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी तर हा ५० खोक्यांपैकी एक खोका दिसत असल्याची टीका केली. मंत्री शिरसाटांनी मात्र, व्हायरल व्हिडिओतील बॅगेत कपडे असल्याचा दावा करत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले, बेडरूममध्ये मी बसलेले आहे. बाजूला माझा सर्वात लाडका कुत्रा आहे. व्हिडिओबद्दल मला आश्चर्य नाही, यात काही गैर नाही, टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातोय. एक बॅग ठेवलेली आहे.

### शिरसाट यांची मालमत्ता ५ वर्षांत १३ पट वाढली; नोटीसही मिळाली

काही दिवसांपूर्वीच शिरसाटांना आयकर विभागाची नोटीसही मिळाली होती. ५ वर्षांत त्यांच्या मालमत्तेत १३ पट वाढ झाल्याचा आरोप आहे. २०१९ मध्ये शिरसाटांनी विधानसभा निवडणुकीवेळी २.४५ कोटी रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता जाहीर केली. परंतु २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी एकूण ३२.९२ कोटींची मालमत्ता जाहीर केली. शिरसाट यांच्या मुलाने अलीकडेच संभाजीनगरातील हॉटेल व्हिट्स ६८ कोटी रुपयांत खरेदी करण्याचा प्रयत्न केल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या होत्या. यामुळे शिरसाटांचे मंत्रिपदही धोक्यात आले होते.

### मंत्री शिरसाट तिसऱ्यांदा आले अडचणीत





बेडरूममध्ये सिगारेटचे कश मारताना शिरसाट. इन्सेट : नोटांची बॅग.

माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शिरसाटांवर जबिंदा बिल्डरकडून १२००० स्क्वेअर फुटांचा प्लॉट फक्त ४८०० प्रति प्रति स्क्वेअर फुटाने घेतल्याचा आरोप केला होता. तर मुलगा सिद्धांत यांनी व्हिट्स ६७ कोटींत खरेदीचा प्रयत्न केला होता. आता शिरसाट बेडरूममध्ये नोटांची बंडले असलेल्या बॅगसोबत दिसताहेत.

### विश्वासघात करणाऱ्यांनी ५० खोके घेतले : आदित्य

ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे म्हणाले की, शिवसेनेचा विश्वासघात करणाऱ्या आणि पक्ष सोडून गेलेल्यांवर आम्ही आधीच ५० खोके घेतल्याचा आरोप करत होतो. मंत्री शिरसाटांनी घेतलेल्या ५० खोक्यांपैकी हा एक खोका आहे.

### बॅगेत पैसे नव्हे, कपडे दिसत आहेत : शिरसाट

नोटांची बंडले असलेल्या बॅगवरून माध्यमांमध्ये उलटसुलट चर्चेला सुरुवात होताच मंत्री शिरसाट यांनी स्वतःहून या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली. त्या बॅगेत नोटा नव्हे तर कपडे दिसत असल्याचा दावा त्यांनी केला.

### शिरसाटांच्या दाव्यांवर दमानियांचा पलटवार

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया म्हणाल्या, शिरसाटांच्या दाव्यांवर मला आश्चर्य वाटते. बॅगेत नोटा स्पष्ट दिसत आहेत, तरी ते कपडे आहेत असा दावा कसा करू शकतात? मी व्हायरल व्हिडिओ बारकाईने पाहिला आहे.

### मंत्रिमहोदय पुन्हा अडचणीत

माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शिरसाटांवर जबिंदा बिल्डरकडून १२००० स्क्वेअर फुटांचा प्लॉट फक्त ४८०० प्रति प्रति स्क्वेअर फुटाने घेतल्याचा आरोप केला होता. तर मुलगा सिद्धांत यांनी व्हिट्स ६७ कोटींत खरेदीचा प्रयत्न केला होता. आता शिरसाट बेडरूममध्ये नोटांची बंडले असलेल्या बॅगसोबत दिसताहेत.

## लाचखोर मुख्याधिकारी चव्हाणला न्यायालयीन कोठडी

**पीसीआर का मिळाला नाही ?**

भ्रष्ट मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण याने १२ लाखाची लाच मागितली. ६ लाख रुपये पहिल्यांदा घ्यायचे मान्य केले. लाच देणारा मुख्याधिकाऱ्यांच्या घरात होता, टेबलवर पैसे ठेवलेले आढळले. मुख्याधिकाऱ्यांनी पैशाची मागणी केल्याचे ऑडिओ क्लिपही आहे. असे असतांना या प्रकरणात मुख्याधिकाऱ्यांना एमसीआर मिळाला. पोलिसांनी या प्रकरणात पीसीआर मागितला होता, तरीही तांत्रिक मुद्दे उपस्थित झाले आणि पीसीआर मिळाला नाही. प्रकरण गंभीर असतांनाही एवढ्या मोठ्या प्रमाणात लाच घेणारे जर कायद्याच्या कचाट्यातून सुटत असतील तर यापुढे अनेकांचे धाडस वाढेल. तपास अधिकाऱ्यांनी यात गांभिर्याने घ्यायला पाहिजे होते अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

माजलगाव । दिव्य न्युज

गुत्तेदाराच्या २ कोटीच्या बीलातील कमिशन म्हणून सहा लाख रुपयांची लाच घेताना माजलगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यास लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडल्यानंतर शुक्रवारी न्यायालयासमोर हजर केले असता त्यांस न्यायालयीन कोठडी सुनावन्यात आली.




शासनाच्या नगर उत्थान अभियान योजनेअंतर्गत केलेल्या सिमेंट रस्त्याच्या २ कोटीच्या कामातील बिलाबद्दल कमिशन म्हणून ६ लाख रुपये व दुसऱ्या कामातील अडथळे, अतिक्रमण काढून घेण्यासाठी ६ लाख अशी १२ लाख रुपयांची लाचेची मागणी मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांनी केली होती. परंतु ही मागणी मान्य नसल्याने तक्रारदार यांनी यासंदर्भातील तक्रार छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत विभागाकडे केली. तक्रारीची सत्यता पडताळल्यानंतर या विभागाच्या पथकाने गुरुवार दिनांक १० रोजी रात्री सापळा रचला. माजलगाव शहरातील पिताजी नगरी येथे किरायाच्या घरी चव्हाण याने सहा लाख रुपयांची लाच स्विकारली. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील पथकप्रमुख पोलीस निरीक्षक केशव दिंडे यांच्यासह अशोक नागरगोजे, राजेंद्र सिनकर यांच्या पथकाने चव्हाणला रंगेहाथ पकडले. त्यावेळी घेतलेल्या घराच्या झडतीत रोख ९४ हजार ८०० रुपयांची रक्कम आढळून आली. त्यानंतर त्यांना शहर पोलीस ठाण्यात रात्री बाराच्या सुमारास आणून ठेवण्यात आले. शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास चंद्रकांत चव्हाण यांना येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता अतिरीक्त सत्र न्यायाधीश राजश्री प. परदेशी यांनी चव्हाण यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. शासनाचे वतीने सरकारी वकील रणजीत वाघमारे यांनी तर चव्हाण यांच्या वतीने ड. शरद सोळंके यांनी काम पाहिले.

## हनुमान नगरच्या रस्त्याचे काम पुर्ण करुन नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी नागरिकांचा मोठा प्रश्न सोडविला

### कित्येक दिवसांपासून प्रलंबित रस्ता काम अखेर पूर्ण





बीड । दिव्य न्युज

गेली अनेक वर्षे दुरावस्थेत असलेला आणि नागरिकांच्या समस्येचे मूळ ठरलेला पेठ बीड येथील हनुमान नगर येथील रस्ता अखेर नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या प्रयत्नांमुळे पूर्ण करण्यात आला आहे. सदरील रस्त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याकडे लेखी मागणी करुन नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी पाठपुरावा केला होता.

शहरातील हनुमान नगर येथील नागरिकांच्या दळणवळणाच्या सोयींसाठी मुख्य असलेला रस्ता हा अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. सदरील रस्त्याची अवस्था इतकी वाईट होती की पावसात तिथे पाणी साचायचे, पादचार्यांना चालणेही कठीण व्हायचे. नगरसेवक अमर नाईकवाडे यांना स्थानिक रहिवाशांनी रस्त्याची मागणी केल्यानंतर त्यांनी त्यावेळचे पालकमंत्री धनंजय मुंडे असतांना त्यांच्याकडे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली लेखी मागणी केली होती. त्यानंतर सदरील रस्त्याचा प्रश्न आज रोजी जिल्हा नियोजनमधून मार्गी लागला आहे, तसेच रस्त्याचे काम संपुर्ण झाले असून आज रोजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी सुरू असलेल्या कामास भेट दिली केले. यावेळी हनुमान नगर येथील रामदास सरवदे, निवृत्ती जगताप, कानडे तात्या, जालिंदर मुळे, भास्कर चांदणे, गोरख सरवदे, संतोष क्षीरसागर, संतोष चांदणे, महेश खूपसे, अशोक शिंदे, रवींद्र क्षीरसागर, पप्पू कांबळे, राहुल काळवणे, आकाश काळवणे, सचिन गालफाडे, पवन खूपसे, नितीन वीर, कांता दौंड, काळू कसबे, सखाराम वैगुंडे, प्रकाश अवसरमल यांची उपस्थिती होती. यावेळी स्थानिक नागरिकांनी नगरसेवक अमर नाईकवाडे यांचे आभार मानले.

## वाघोलीतील भाजी बाजार ठरू नये डेंग्यूचे उगमस्थान

पुणे । दिव्य न्युज

वाघोलीतील आव्हाळवाडी चौकात असलेल्या भाजी बाजारात प्रचंड कचरा, जीवघेणी दुर्गंधी दिवसेंदिवस गंभीर होत आहे. बाजार शहराच्या मुख्य भागात असून बसस्थानक आणि पुणे अहिल्यानगर मार्ग दोन्ही जवळ आहेत.शहरात येणारे आणि बाहेर जाणारे लोक या बाजारापासून जातात. त्यामुळे हा परिसर शहराच्या प्रतिमेचे प्रतिबिंब बनतो. बाजारात मातीच्या आणि कचर्याच्या ढिगार्यांजवळ विकला जाणारा भाजीपाला आरोग्यासाठी घातक ठरतो आहे.सध्या वाघोलीत डेंग्यूचा प्रादुर्भाव झपाट्याने पसरत आहेत.

भाजी बाजार आणि आजूबाजूला साचलेले अस्वच्छ पाणी आणि कचरा हे डासांच्या उत्पत्तीचे प्रमुख कारण ठरत असून त्यामुळे डेंग्यूसारख्या धोकादायक आजाराला चालना मिळत आहे.येथील स्वच्छतेची व्यवस्था अत्यंत निकृष्ट असून, रात्रीच्या वेळी योग्य दिवाबत्ती नसल्याने बाजारपेठ व परिसर अंधारात बुडालेला असतो. कचर्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य जागा नसल्यामुळे कचरा इकडे तिकडे पसरत असल्याने अस्वच्छता आणखी वाढत आहे. महानगरपालिका या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढू शकतात.परंतु तसे काही होताना दिसून येत नाही.शहर स्वच्छ करण्यासाठी, लोकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि डेंग्यूसारख्या आजारांना प्रतिबंध करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी करण्यात येत आहे.

वाघोली गावची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. इमारतीमध्ये तसेच सोसाट्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. गावाच्या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. कचरा उचलला जात नाही. महापालिकेचे अवघे काही कर्मचारी स्वच्छतेच्या कामासाठी नेमले आहेत,अनेक वेळा तक्रारी करूनसुद्धा महापालिकेकडून कामे होत नाहीत.

– प्रकाश जमधडे, सरचिटणीस, पुणे शहर, राष्ट्रवादी शरद पवार गट.

वाघोलीत डास निर्मूलन मोहिमेला प्राधान्य दिले नाही, तर येत्या काही दिवसांत डेंग्यू, मलेरिया सारख्या रोगांचे प्रादुर्भाव भयंकर स्वरूप घेऊ शकतात,नागरिकांनीही स्वतःच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी पाणी साचू न देणे, स्वच्छता राखणे आणि प्रशासनाकडे या संदर्भात तक्रारी करणे गरजेचे आहे.

– डॉ. पल्लवी मेहरे, वाघोली, पुणे.




# धार्मिक स्थळांवरील भोंगे हटविले

### फडणवीस : तक्रारदाराला दंडाची ५० टक्के रक्कम देण्याचा विचार

मुंबई । दिव्य न्युज

मुंबईतील एक हजार सर्व धर्मीयांच्या ६०८ धार्मिक स्थळांवरील भोंगे पूर्णपणे हटविण्यात आले आहेत. मुंबई आता पूर्णपणे भोंगेमुक्त करण्यात आली आहेत त्याचप्रमाणे राज्यभरातील तीन हजार ३६७ धार्मिक स्थळांवरील भोंगे हटविण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना दिली.

भाजपचे ज्येष्ठ सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबतचा मुद्दा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला होता. राज्यातील किती धार्मिक स्थळांवरील भोंग्यांवर कारवाई करण्यात आली असे त्यांनी विचारले. तसेच जो या भोंग्यांची तक्रार देईल त्याला दंडाच्या रकमेच्या पन्नास टक्के रक्कम देण्याची मागणीही त्यांनी केली. यावर उत्तर देताना फडणवीस यांनी मुंबईतील एक हजार १४९ मशिदी, ४८ मंदिरे, दहा चर्च, चार गुरुद्वारा तसेच १४८ अन्य धार्मिक स्थळे यावरील भोंगे हटविण्यात आल्याचे सांगितले. आतापर्यंत राज्यातील तीन हजार ३६७ धार्मिक स्थळांवरील भोंगे हटविण्याची कारवाई केली आहे. यानंतर जर कोणत्या धार्मिक स्थळांवर पुन्हा भोंगे लावण्यात आले तर संबंधित पोलिस ठाण्याच्या प्रमुखाला यासाठी जबाबदार धरण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### सकाळच्या दहाच्या भोंग्याचे काय ?

अनिल पाटील यांनी 'इतर भोंगे बंद झाले, पण रोज सकाळी दहा वाजता सुरू होणाऱ्या भोंग्याचे काय, असा सवाल खासदार आणि शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांचे नाव न घेता केला. त्यावेळी आपली एकच अडचण आहे, ध्वनिप्रदूषणाचा कायदा आहे पण विचाराच्या प्रदूषणाचा कायदा अद्याप व्हायचा आहे. तो होईल तेव्हा त्यावर विचार करू, असा टोला फडणवीस यांनी लगावला




### ठाकरेंकडून अभिनंदन

भोंगे काढल्याबद्दल शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. येत्या काळात दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र असे सण-उत्सव येणार आहेत. त्यावेळी तात्पुरते मंडप उभारण्यात येतात. त्यांना परवानगी देताना पोलिस मंडळांना नाहक त्रास देतात. तो होऊ नये अशी अपेक्षा ठाकरे यांनी व्यक्त केली. तेव्हा मंडळांना जर विनाकारण त्रास झाल्यास आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

## डेसिबल मर्यादेमध्ये सुधारणेची गरज : सना मलिक

मुंबई : पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत ठरवलेली ध्वनी प्रदूषण मर्यादा सध्याच्या परिस्थितीत अपुरी ठरत असून याकडे आमदार सना मलिक- शेख यांनी धार्मिक कार्यक्रमातून होणाऱ्या ध्वनिप्रदूषण विषयावर लक्षवेधीमध्ये शुक्रवारी सभागृहाचे लक्ष वेधले.



त्या म्हणाल्या, ध्वनिप्रदूषण कायदा २००० मध्ये बनविण्यात आला. त्यामध्ये रहिवासी भागात दिवसा ५५ आणि रात्री ४५ एवढी डेसिबल मर्यादा आहे तर व्यावसायिक भागात दिवसा ६५ आणि रात्री ५५ डेसिबल व औद्योगिक परिसरात दिवसा ७५ आणि रात्री ७० डेसिबल मर्यादा आहे. मात्र सध्या ही डेसिबल मर्यादा ओलांडली आहे. त्यामुळे या मर्यादांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. हा सरकारच्या विषय केंद्र अखत्यारीत येतो. परंतु राज्यात याबाबत सर्वेक्षण करून तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे एकमताने पाठवला तर आपल्याला नवीन डेसिबल मर्यादांमध्ये सुधारणा मिळू शकते, असे सांगत सना यांनी सभागृहातील डेसिबल मर्यादा ६०वर आहे हेही सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. 'हा विषय खरा आहे. या मुद्द्यावर सखोल विचार करून सुधारित मर्यादेसंदर्भात शिफारस केंद्र सरकारकडे पाठवू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर उत्तर देताना दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०